ePaper

# शरद पवारांमुळे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त!: चंद्रशेखर बावनकुळे



| वर्ष - 6 । अंक - 318 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- धंगेकरच पुणे लोकसभेचे उमेदवार?
- राष्ट्रवादीची चूक; भाजपाने सुधारली!
- पोलीस भरतीसाठी आलेल्या उमेदवारांची रात्र रस्त्यावर

www.mahaenews.com । रविवार , दि. 5 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



# भाजपासाठी शंकर जगताप ‘संकटमोचक’!

## चिंचवडमध्ये ‘जगताप पॅटर्न’ : आगामी राजकारणात निर्णायक भूमिका

।पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील पोटनिवडणूक आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकांमध्ये भाजपाची मोठी पिछेहाट सुरू असताना चिंचवडमध्ये केवळ ‘जगताप पॅटर्न’मुळेच पक्षाची पत राहिली. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचे बंधू शंकर जगताप यांनी अचूक नियोजन करीत महाविकास आघाडीचे तगडे आव्हान रोखले. त्यामुळे या पोटनिवडणुकीत भाजपाचा विजय सोपा झाला. त्यामुळे शंकर जगताप भाजपासाठी ‘संकटमोचक’ ठरले आहेत.**



**दिवंगत** आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनापूर्वी त्यांच्यावर सुमारे दोन वर्षे रुग्णालयात औषधोपचार सुरू होते. या काळात वैद्यकीय तज्ज्ञांनी विश्रांतीचा सल्ला दिल्यानंतर जगताप यांना मतदार संघात बाहेर पडता आले नाही. या काळात भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी त्यांचे लहान बंधू उद्योजक शंकर जगताप यांच्या खांद्यावर चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी पदाची जबाबदारी सोपवली होती. त्यानंतर शंकर यांनी मतदार संघात मोर्चेबांधणी सुरू केली. दि. ३ जानेवारी २०२३ रोजी लक्ष्मण जगताप यांचे निधन झाले. त्यावेळी कुटुंबाला सावरण्याची मोठी जबाबदारी शंकर जगताप यांच्यावर पडली.

लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर भाजपामधील नाराज आणि जगताप विरोधी गट राष्ट्रवादीच्या संपर्कात होता. संभाव्य मोठी फूट लक्षात घेवून भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी सावध भूमिका घेतली. जगताप विरोधी गटाचा विरोध थोपवणे आणि बंधू लक्ष्मण यांच्या निधनानंतर महिन्याभरात निवडणुकीला सामोरे जाण्याचे मोठे आव्हान शंकर जगताप यांच्यासमोर आले होते.

निवडणुकीच्या सुरूवातीपासूनच भाजपाची उमेदवारी शंकर जगताप यांना दिली जाईल, अशी चर्चा होती. त्याबाबत भाजपाच्या पक्षश्रेष्ठींकडून एकमतही झाले होते. तसेच, ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रदेश-स्थानिक नेत्यांनी पुढाकार घेतला होता. मात्र, निवडणूक लागली. महाविकास आघाडीने माघार घेतली नाही. त्यामुळे अटीतटीच्या सामन्यात भाजपासह कुटुंबांचा लौकीक टिकवण्यासाठी शंकर जगताप यांनी अक्षरश: जीवाचे रान केले आणि विजयश्री खेचून आणली.

विजयानंतर शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी सूचक वक्तव्य केले होते. “चिंचवडमध्ये जगताप पॅटर्न चालतो... त्या ठिकाणी लोकांनी भाजपाला नव्हे, तर जगताप कुटुंबियांना मते दिली आहेत.” असे जाहीरपणे वक्तव्य राऊत यांनी केले. त्यामुळे ‘जगताप पॅटर्न’ची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झाली.

## काय आहे ‘जगताप पॅटर्न’



» दिवंगत लक्ष्मण जगताप यांनी तब्बल २० वर्षे पिंपरी-चिंचवड शहरात आपल्या नेतृत्वाचा करिष्मा कायम ठेवला आहे. किंबहुना, भारतीय जनता पार्टीचा शहरातील सत्तेचा मार्ग सोपा करण्यात जगताप यांचा सिंहाचा वाटा आहे. महापालिकेतील सत्तेच्या पाच वर्षांच्या काळात जगताप यांनी अपवाद वगळता अनेक समर्थकांना महत्त्वाची पदे दिली आहेत. मतदार संघातील प्रत्येक गावामध्ये जगतापांचा कट्टर समर्थक आहेत. यासह राष्ट्रवादीसह सर्वपक्षीय काही मान्यवर जगताप यांच्यासाठी अप्रत्यक्ष काम करीत असतात. केलेली विकासकामे आणि मतांची अचूक गोळाबेरीज याचा जगताप यांना कायम फायदा होतो. साम, दाम, दंड आणि भेद अशा सर्व आयुधांचा वापर करुन जगताप या मतदार संघाचे अनभिषिक्त सम्राट राहिले आहेत. त्यांच्याच तालमीत तयार झालेले शंकर जगताप आहेत. माजी नगरसेवक म्हणून त्यांनी पाच वर्षे सभागृहात कामकाज केले आहे. यासह अत्यंत शांत, संयमी आणि तितकेच अभ्यासू असलेले शंकर जगताप यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जातात. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या यंत्रणेतील ‘बॅक बोन’ म्हणून त्यांचा मतदार संघातील बारीक-सारीक गोष्टींत अप्रत्यक्ष निर्णायक हस्तक्षेप असतो. हाच अनुभव शंकर जगताप यांच्या कामाला आला आणि निर्णायक मताधिक्य घेण्यात शंकर जगताप यशस्वी झाले. परिणामी, अश्विनी जगताप या ३६ हजारहून अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत.

## राष्ट्रवादी अन् महाविकास आघाडीचे बुरूज असे ढासळले...

» चिंचवडमधील एकूण १३ प्रभागांमध्ये शंकर जगताप यांनी आपली स्वतंत्र यंत्रणा कामाला लावली होती. वास्तविक, नवी सांगवी, जुनी सांगवी, पिंपळे गुरव हा परिसर जगताप यांचा प्रभावक्षेत्र राहिले आहे. रावेत, किवळे, मामुर्डी, वाकड, पुनावळे, वाल्हेकरवाडी यासह थेरगाव, रहाटणी या भागात राष्ट्रवादीचा प्रभाव मोठा आहे. या भागातून राष्ट्रवादीचे मताधिक्य रोखण्यात शंकर जगताप आणि टीम यशस्वी झाली. राष्ट्रवादीचे दिग्गज नगरसेवक असलेल्या रावेत, किवळे मामुर्डी भागात सर्वाधिक तब्बल ११ हजार ६३७ मते अश्विनी जगताप यांना मिळाली आहेत. मतमोजणीत या भागातून घेतलेली आघाडी भाजपाने शेवटपर्यंत ठेवली. तसेच, पिंपळे निलख, वाकड, वेणू नगर, कस्पटेवस्ती, विशालनगर या भागात महाविकास आघाडीला सर्वाधिक मतदान होईल, असा दावा केला जात होता. मात्र, या ठिकाणी ११ हजार ४७५ अशी सर्वाधिक मते भाजपाला मिळाली आहेत. रहाटणी, काळेवाडी आणि पिंपळे सौदागर हा महाविकास आघाडीचे उमेदवार विठ्ठल उर्फ नाना काटे यांचे प्रभावक्षेत्र वगळता गेल्या पंचवार्षिकमध्ये राष्ट्रवादीचे नगरसेवक असलेल्या भागात भाजपाने बाजी मारली आहे. राष्ट्रवादीबहुल भागात सूक्ष्म नियोजन करुन एक-एक मत गोळा करण्यासाठी शंकर जगताप यांनी भाजपासोबत स्वत:ची स्वतंत्र यंत्रणा कामाला लावली होती. त्यामुळेच राष्ट्रवादीचे बुरूज ढासळले.

# धंगेकरच पुणे लोकसभेचे उमेदवार?

## पुण्यात काँग्रेसला बळः कसबा पोटनिवडणुकीनंतर मविआ कार्यकर्ते आशावादी

। पुणे। महाईन्यूज ।

पुणे हा एकेकाळी काँग्रेस आणि राष्ट्रवादीचा बालेकिल्ला होता. शरद पवार आणि सुरेश कलमाडी यांचे नेतृत्व पुणेकरांनी मान्य केलं होतं.२००४ आणि २००९ च्या लोकसभा निवडणुकीत सुरेश कलमाडी पुणे लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले होते. महापालिका आणि विधानसभेतही या काळात काँग्रेस आणि राष्ट्रवादीचं वर्चस्व होतं. मात्र, २०१४ साली संपूर्ण देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींची लाट आली यांनी या लाटेत पुणे सुद्धा भाजपमय झालं. २०१४ पुणे शहराचा खासदार आणि आमदारही भाजपचे झाले. मात्र, कसबा पोटनिवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेसचा आठ वर्षाचा आमदारकीचा वनवास आता संपला आहे.

कसबा पोटनिवडणुकीच्या निकालावरून महाविकास आघाडी एकत्र लढली तर भाजपला रोखणे शक्य असल्याचा विश्वास आता महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना वाटत आहे. याच विश्वासाच्या जोरावर आता पुणे लोकसभेचे गणितं सुद्धा बदलणार असल्याची चर्चा पुण्यातील राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. जागा वाटपाच्या सूत्रात आघाडीमध्ये पुणे लोकसभेची जागा ही काँग्रेसकडे आहे. त्यामुळे कसबा विधानसभा मतदारसंघात जायंट किलर ठरलेले रवींद्र धंगेकर हे खासदारकीचे काँग्रेसचे उमेदवार असू शकतात, अशी चर्चा राजकीय पंडित करत आहेत.



देशात लोकसभेच्या निवडणुका मार्च २०२४ ते मे २०२४ या दरम्यान होण्याची शक्यता आहे. सध्या पुणे शहरात जर पक्षीय बलाबळ पाहिलं तर शहरातील ८ विधानसभा मतदारसंघात भाजपचे ५, राष्ट्रवादीचे २ आणि काँग्रेसचा आता १ आमदार आहे. यात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शहरातील काही मतदारसंघात भाजपचा निसटता विजय झाला होता. यात शिवाजीनगर मतदारसंघात भाजपचे सिद्धार्थ शिरोळे यांनी काँग्रेसचे दत्ता बहिरट यांचा ५१२४ इतक्या मतांनी निसटता पराभव केला होता. तर खडकवासला मतदारसंघात राष्ट्रवादीच्या सचिन दोडके यांना भाजपच्या भीमराव तापकीर यांच्याकडून अवघ्या २५९५ मतांनी पराभव स्वीकारावा लागला होता. तिकडे पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघात देखील भाजपची अशीच अवस्था राहिली आहे या मतदारसंघात भाजपच्या सुनील कांबळे यांनी काँग्रेसच्या रमेश बागवे यांचा अवघ्या ५०१२ मतांनी पराभव केला होता. तर पर्वती मध्ये माधुरी मिसाळ आणि कोथरूड मध्ये चंद्रकांत पाटील यांनी मात्र मोठा मताधिक्यांनी विजयी प्राप्त केला होता.

दुसरीकडे वडगाव शेरी आणि हडपसर मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झालेले आहेत. त्यामुळे आता महाविकास आघाडीने एकत्रित ताकद लावल्यास २०१९ च्या निवडणुकीत निसटता पराभव स्वीकाराव्या लागलेल्या मतदारसंघात देखील विजय शक्य होणार असल्याचा दाट विश्वास आता महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना आहे. त्यामुळेच पुणे लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी कडून रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी देऊन विजयाचे स्वप्न महाविकास आघाडीचे कार्यकर्ते पाहत आहेत.

कसबा पोटनिवडणुकीत आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा वापरली तरी भाजपला उपयोग झालेला नाही. पुणे शहरावर असलेली भाजपची पकड आता सैल होत आहे असं दिसून येत आहे. याची प्रचिती कसबा पोटनिवडणुकीत देखील आली. हीच बाजू धंगेकरांसाठी जमेची आहे. त्यामुळे अवघ्या वर्षभरावर आलेल्या लोकसभा निवडणुकीतही रवींद्र धंगेकर हे जायंट किलर ठरतील आणि पुणे लोकसभेवर पुन्हा एकदा सुरेश कलमाडी यांच्यानंतर काँग्रेसचा झेंडा फडकेल, असा विश्वास महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

### फडणवीसांचं राजकारण दुश्मनीचं...

आपल्या महाराष्ट्राला सुसंस्कृत राजकारणाची आणि राजकीय नेत्यांची परंपरा आहे पण देवेंद्र फडणवीस याला अपवाद आहेत. देवेंद्र फडणवीस यांचं राजकारण कुरघोडीचं, दुश्मनीचं आणि दबावाचं आहे. विरोधकांना राजकीय जीवनातून उद्ध्वस्त करायचं हाच अजेंडा घेऊन फडणवीस काम करतात. लोकशाहीची हत्या कशी करतात ते देवेंद्र फडणवीस यांच्याकडून शिकावं. आज जरी असं राजकारण त्यांना चांगलं वाटत असेल पण हा क्षणिक आनंद आहे. आज सत्तेत असल्याने लोक त्यांना नमस्कार करतात पण सत्ता गेल्यावर लोक नमस्कार देखील घालणार नाही. फडणवीसांमुळे भाजपची प्रतिमा मलिन झालीये. त्यांच्यामुळे भाजपकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन वेगळा झालाय. त्यामुळे याचा शेवट चांगला होणार नाही, फडणवीस भाजपला रसातळाला घेऊन जातील, असा हल्लाबोल कसब्याचे नवनिर्वाचित काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर यांनी केला.

---

# शेतात मका जोमानं उभा, पण आत भलताच उद्योग चाललेला

## पोलिसांना टिप मिळाली, छापा टाकला अन्...शेतीच्या नावाखाली या शेतकऱ्यांनी केला गैरप्रकार

।इंदापूर, पुणे । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

इंदापूर तालुक्यातील पळसदेव येथे अफूची सामूहिक शेती करणाऱ्या सहा शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झालेल्या सहापैकी चार जणांना अटक करण्यात आली आहे. इंदापूर पोलिसांनी त्यांच्याकडून ७ हजार ८७ किलो वजनाची १ कोटी ४१ लाख ७४ हजार रुपये किमतीची अफूची बोंडे जप्त केली आहेत. काशीनाथ बनसुडे, दत्तात्रय बनसुडे, राजाराम शेलार, लक्ष्मण बनसुडे, माधव बनसुडे, रामदास शिंदे अशी आरोपींची नावे आहेत. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार यांनी त्यांच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे.



एन.डी.पी. एस. कायदा १९८५चे कलम ८,१५, १८, ४६ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

काशीनाथ रामभाऊ बनसुडे, दत्तात्रय मारुती बनसुडे, राजाराम दगडु शेलार, लक्ष्मण सदाशिव बनसुडे, माधव मोतीराम बनसुडे, रामदास जगन्नाथ शिंदे (सर्व रा. माळेवाडी, पळसदेव ता. इंदापुर) या सहा शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी इंदापूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार यांनी अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याअन्वये सरकारतर्फे फिर्याद दिली आहे.

इंदापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप पवार यांनी या प्रकरणी माहिती दिली. इंदापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पळसदेव गावात असलेल्या माळेवाडी, शेलारपट्टा परिसरातील काही शेतकऱ्यांनी अफूची लागवड केल्याची माहिती पोलिसांना एका खबऱ्याकडून मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने इंदापूर पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला. पोलिसांना मका पिकामध्ये काही प्रमाणात अफूची लागवड केल्याचे आढळून आले. सध्या पिकाचा बहर सुरू झाला असून फुलांचे रूपांतर अफूच्या बोंडामध्ये झाल्याचे आढळून आले. येथील शेतकऱ्यांचा प्रताप पाहून पोलीसही अचंबित झाले होते.

### इंदापूरसह परिसरात एकच खळबळ उडाली

या अफूची पूर्ण वाढ झाली असून त्याची बोंडेही वर आली आहेत. मात्र, तरीही ही अफूची शेती कोणाच्याच नजरेस पडली नाही. पोलिसांना गुरुवारी (ता. ०२) दुपारी या शेतीचा सुगावा लागला आणि तब्बल दीड एकरातील ही अफूची शेती आढळून आली आणि इंदापूरसह परिसरात एकच खळबळ उडाली.

### पोलिसांनी अफूची बोंडे मजुरांच्या साह्याने काढली

पोलिसांनी अफूची बोंडे मजुरांच्या साह्याने काढली. अफूची बोंडे पिशवीत भरण्यात आली आहेत. ७ हजार ८७ किलो वजनाची १ कोटी ४१ लाख ७४ हजार रुपये किमतीची ही अफूची बोंडे पोलिसांनी जप्त केली आहेत. या सहा शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने हे या प्रकरणी करत आहेत. दरम्यान, अप्पर पोलीस अधीक्षक आनंद भोईटे, उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश इंगळे, उत्पादन शुल्क निरीक्षक पोळ, तालुका कृषी अधिकारी यांनी घटनस्थळाला भेट दिली.

# राष्ट्रवादीची चूक; भाजपाने सुधारली!

## » शास्तीकर माफी : पिंपरी-चिंचवडचा मजबूत किल्ला अभेद्य ठेवला!






।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवडमध्ये सलग १५ वर्षे निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला अधोगती का लागली? याचा आत्मचिंतन राष्ट्रवादीच्या नेत्यांनी करण्याची आवश्यकता आहे. शहराचे राजकारण अनधिकृत बांधकाम, शास्तीकर, रेड झोन यासह पाणी आणि कचरा या प्रमुख मुद्यांवर फिरते, यावर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीवरुन शिक्कामोर्तब झाले आहे.**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीनंतर महाविकास आघाडी पर्यायाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला खऱ्या अर्थाने आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे. संपूर्ण राज्यात भाजपा पोटनिवडणूक आणि पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत पिछाडीवर असताना पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपा आजही टिकून आहे. याचे प्रमुख कारण दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांचा करिष्मा आजही चालला. वास्तविक, २०१४ मध्ये अनधिकृत बांधकाम, शास्तीकर, रेड झोन, पाणी व कचरा प्रश्न याच मुद्यांवर शहराला न्याय मिळत नाही, असा आरोप करीत लक्ष्मण जगताप यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकला होता, हा इतिहास आहे.

तत्कालीन आघाडी सरकारने दि. ४ जानेवारी २००८ रोजी राजपत्र प्रसिद्ध केले. सदर अधिनियमानुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये "कलम २६७ अ- अवैध इमारतींवर शास्ती बसवणे" हे कलम नव्याने समाविष्ट केले. त्यावेळी महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची एकहाती सत्ता होती. महापौरपदी डॉ. वैशाली घोडेकर आणि आताचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे त्यावेळी स्थायी समिती सभापती होते. महापालिकेतील सत्ता आताचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या अधिपत्याखाली चालवली जात होती.

तत्कालीन मुख्यमंत्रीपदी स्व. विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या नेतृत्वाखालील तत्कलीन आघाडी सरकारने मूळ कायद्यात बदल केला. त्यावेळी महापालिकेतील सत्ताधारी राष्ट्रवादीने विरोध केला नाही. महापालिका स्थायी समिती आणि महासभेत केलेले ठाराव तत्कालीन आघाडी सरकारने रद्द केले. त्यावेळी राष्ट्रवादीचे अजित पवार निर्णायक भूमिकेत होते. पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणाची दिशा ठरवणारी ही उदासीनता ठरेल, याची तिळमात्र कल्पना अजित पवार यांना आली नाही.

### भाजपाचा सकारात्मक पुढाकार...

**» पिंपरी-चिंचवडकरांची मानसिकता ओळखून २०१४ मध्ये सत्तेत आलेल्या भाजपाने २०१७ मध्ये महापालिकेत सत्ता मिळाल्यानंतर शहरातील प्रमुख विषय सोडवण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. दि. ११ जानेवारी २०१७ रोजी शास्तीकराच्या कायद्यात बदल करण्यात आला. कलम- २६७-अ मध्ये- " अशा इमारतींवर महानगरपालिकेकडून ठरविण्यात येईल अशा दराने शास्ती भरण्यास पात्र असेल" असा समावेश करण्यात आला. दि.८ मार्च २०१९ रोजी १००० चौरसफूटापर्यंतच्या निवासी बांधकामांना शास्तीची आकारणी करू नये. १ हजार ते २ हजार चौ. फूटापर्यंतच्या बांधकामांना मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने आकारणी आणि २ हजार चौ. फूटापुढील बांधकामांना मालमत्तादराच्या दुप्पट दराने शास्ती आकारणीचा निर्णय घेण्यात आला. मात्र, सरसकट शास्ती माफीबाबत शहरातील दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडकरांची बाजू लावून धरली.**

२००८ पासून २०१४ पर्यंत ६ वर्षे राज्यात निर्विवाद सत्ता असतानाही अनधिकृत बांधकाम, शास्तीकर, रेड झोन, पवना जलवाहिनी, कचरा प्रक्रिया प्रकल्प हे मुद्दे हाताबाहेर करण्याची संधी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने किंबहूना अजित पवार यांनी घालवली. त्यामुळे राष्ट्रवादीविरोधात 'अंडर करंट' निर्माण झाला. दुसऱ्या बाजुला देशात आणि राज्यात भाजपाचा प्रभाव वाढला. चिंचवड मतदार संघातून लक्ष्मण जगताप भाजपाच्या तिकीटावर आणि भोसरी मतदार संघातून महेश लांडगे २०१४ मध्ये अपक्ष निवडून आले. तर पिंपरी मतदार संघात शिवसेनेचे गौतम चाबुकस्वार निवडून आले होते. याच वेळी खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी शहरातून हद्दपार झाली. पुढे २०१९ मध्ये जगताप आणि लांडगे भाजपाच्या तिकीटावर लढले. पिंपरीची जागा राष्ट्रवादीने नव्हे, तर केवळ अण्णा बनसोडे यांच्या करिष्म्यामुळे राखता आली. २०१७ मध्ये महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीला महापालिका सत्तेतून पायउतार व्हावे लागले.

### महाविकास आघाडीच्या सत्ताकाळातही उदासीनता...

**» २०१९ मध्ये राज्यात महाविकास अघाडीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सत्तेत होती. अडीच वर्षांच्या कालावधीत तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पिंपरी-चिंचवडमधील कळीचा मुद्दा म्हणून शास्तीकराचा प्रश्न सोडवण्याची नामी संधी होती. त्यासाठी भाजपा-शिवसेना युतीच्या सत्ताकाळात काही बदल केलेले होते. त्याचा धागा पकडून अजित पवार शास्तीकर माफीचा निर्णय सहज घेवू शकत होते. तसेच, महापालिकेतील सत्ताधारी भाजपा सरसकट शास्तीमाफीचा प्रस्तावा दोनवर्षांपासून प्रलंबित असताना महाविकास आघाडी सरकारने शास्ती वगळून मिळकतकर भरण्याचा आदेश काढून पिंपरी-चिंचवडकरांच्या तोंडाला पाने पुसली.विशेष म्हणजे, महापालिकेतील एक वरिष्ठ अधिकारी आणि राष्ट्रवादीचा एक महत्त्वाचा पदाधिकारी शास्तीकर माफीबाबत अजित पवार यांना कागदासह भेटले होते. मात्र, अजित पवार यांनी याबाबत उदासीनता दाखवली. त्यामुळे अडीच वर्षांत भाजपावर कुरघोडी करण्याची संधी असतानाही अजित पवार आणि राष्ट्रवादी गाफील राहीली. परिणामी, डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शास्तीकरमाफीची घोषणा केली. त्या घोषणेचे स्वागत करण्याची वेळ अजित पवार यांच्यावर आली. याबाबत राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींनी खऱ्या अर्थाने आत्मचिंतन करण्याची आवश्यकता आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने शास्तीकराबाबत केलेली चूक भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी सुधारली. त्यामुळे सुमारे १ लाख मिळकतधारकांना म्हणजे किमान ४ लाख मतदारांना प्रभावित करणारा हा निर्णय ठरला.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी शहरातील नागरिकांच्या कळीच्या मुद्याला निकालात काढले. त्यामुळेच चिंचवडच्या निवडणुकीत भाजपाला यश मिळाले, असे म्हणावे लागेल. अन्यथा ही निवडणूक खऱ्या अर्थाने महाविकास आघाडीच्या बाजुने झुकलेली पहायला मिळत होती.

# काळेवाडीत सराईत दुचाकीचोर गजाआड!

## » वाकड पोलिसांची कारवाई : चार दुचाकीसह मुद्देमाल जप्त



।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**वाकड पोलिसांनी चार दुचाकीसह सराईताला अटक केली आहे. त्याच्याकडून 1 लाख 85 हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. दादासाहेब उर्फ अनिकेत बाळू निकाळजे (वय 26, रा. इंदिरानगर झोपडपट्टी, सुकटा, ता. भूम, जि. उस्मानाबाद) असे अटक केलेल्या दुचाकी चोराचे नाव आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाचपीर चौक काळेवाडी येथे एकजण चोरीची दुचाकी विकण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलीस शिपाई स्वप्नील लोखंडे यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा लावला. एक तरुण दुचाकीवरून आला. त्याचा संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे त्याला पोलीस ठाण्यात आणून विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याच्याकडे असलेली दुचाकी चोरीची असून त्याने आणखी तीन दुचाकी चोरल्याचे सांगितले. मागील वर्षी चोरलेल्या दोन आणि यावर्षी चोरलेल्या दोन अशा 1 लाख 85 हजार रुपयांचा चार दुचाकी त्याच्याकडून जप्त केल्या आहेत. याबाबत वाकड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल होते.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यवान माने, पोलीस निरीक्षक (गुन्हे एक) संतोष पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे दोन) रामचंद्र घाडगे, सहायक पोलीस निरीक्षक संतोष पाटील, उपनिरीक्षक सचिन चव्हाण, पोलीस अंमलदार अतिश जाधव, प्रशांत गिलबिले, स्वप्नील लोखंडे, विनायक घार्गे, कौंतेय खराडे, अजय फल्ले, तात्या शिंदे, भास्कर भारती यांनी केली.

## संपादकीय »

# पैसा : काळ्याचा पांढरा आणि पांढऱ्याचा सत्शील

***ऐंशीच्या दशकात जगाचे अर्थकारण झपाट्याने बदलू लागले. जागतिक व्यापाराला गती आली. जगातल्या डाव्या राजवटी कमकुमत होत गेल्या. औपचारिक अर्थकारणाबरोबरच अर्थकारणाचे अधोविश्वही फोफावू लागले.***

पैसा देशांच्या सीमा ओलांडून वाहतो, तेव्हा तो काळ्याचा पांढरा आणि पांढऱ्याचा सत्शील व सद्गुणी बनत जातो. अमेरिकेच्या लक्षात हा धोका पहिल्यांदा आला आणि तेथे काळ्या पैशाचे रूपांतर रोखण्याचा कडक कायदा आला. भारतात काळ्या पैशाच्या विरोधातला कायदा होता; मात्र मागच्या 'एनडीए' म्हणजे वाजपेयी सरकारने हा कायदा केला, तेव्हा असा कठोर कायदा भारतातही व्हावा, असे दडपण जगातून येत होते. ते चूकही नव्हते. त्यातून हा धनधुलाईला प्रतिबंध करणारा कायदा तयार करण्यात आला. आज या कायद्याची अंमलबजावणी करणारी सक्तवसुली संचालनालय ही यंत्रणा, म्हणजे 'ईडी' ज्या वेगाने आणि ताकदीने कामाला लागली आहे; त्यामुळे या कायद्याकडे साऱ्यांचे लक्ष गेले. त्यातूनच सर्वोच्च न्यायालयात 'पीएमएलए' म्हणजे 'प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँडरिंग अॅक्ट'ला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका करण्यात आल्या. त्यात अनेक नामांकित याचिकादार होते. हा कायदा योग्य असून; त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याला कोणत्याही प्रकारे बाधा येत नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे. या निकालामुळे केंद्र सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. या निकालाचे समर्थन करताना न्या. संतोष हेगडे यांच्यासारख्या नेक कायदेपंडिताने, 'एखाद्या कायद्याची अंमलबजावणी कशी होते किंवा निकाल कसे लागतात, यावर त्या कायद्याची प्रस्तुतता ठरत नाही,' असे म्हटले आहे.

सध्या सक्तवसुली संचालनालय सोनिया गांधी, पी. चिदंबरम, मेहबूबा मुफ्ती यांच्यासहित देशभरातील किती तरी नामांकित व्यक्तींवर या कायद्याखाली कारवाई करीत आहे. पश्चिम बंगालमध्ये गेल्या तीन दिवसांत जप्त झालेल्या रकमेचा आकडा ४० कोटी रुपयांच्या वर गेला आहे. याशिवाय, सोने; तसेच स्थावर मालमत्ताही सापडत आहेत. 'पीएमएलए' हा कायदा केवळ काळ्या पैशाच्या विरोधात नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. जगभरातला काळा पैसा हा अनेक मार्गांनी आधी अधोविश्वात आणि नंतर थेट दहशतवाद्यांच्या हातात जातो. काश्मीरमध्ये 'ईडी'ने केलेल्या कारवाया न्यायालयीन निकालांनी तडीस गेल्या, तर हा मुद्दा स्पष्ट होईल. सर्वोच्च न्यायालयात ही सुनावणी चालू असतानाच, संसदेत सरकारने जी माहिती दिली, ती पाहता नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यापासून 'ईडी'चे काम कित्येक पटींनी वाढले आहे.



## आनंदी सकाळ

# 'मातृदेवो भव'

पवित्रता ज्या त्यागाहून सहनशीलतेतून प्रकट होते, हे सर्वशील-चारित्र्याचे मूलभूत गुण व देवतुल्य मनोवृत्ती आहेत. म्हणून भारतीय सौंदर्यबोधही अशा उच्च गुणांनी युक्त आहे. जे शीलवान आहे, ते सुंदर आहे; कारण ते निष्कलंक आहे, शुद्ध आहे. म्हणूनच ते मोहक व अनुपम आहे. नारी-नारायणी रूप नैतिक सौंदर्याचा समुच्चय आहे. मातृरूप, मातृभाव या सौंदर्याचा सर्वोत्तम अनुभव आहे. पुत्र हा कुपुत्र होऊ शकतो; परंतु माता ही कधीच कुमाता होत नाही, असा दृढ विश्वास 'आई' या दोन अक्षरांत आहे. नारदाने भक्तीच्या एकादश आसक्तीत वात्सल्याचा अंतर्भाव केला आहे. संतांनी ईश्वरास, सद्गुरूस माऊली भावाने हाक मारली. 'मातृदेवो भव' ही सार्वकालिक आस्था आहे. भारतीयांनी याच मनोभूमिकेत मातृभूमीस 'आई'च्या उदात्त भावनेने स्वीकारले; त्यामुळे भारतीय अध्यात्म हे सतत सर्वोदय व राष्ट्रोद्धाराशी

# उद्योजक अरविंद गोयल यांचा दानशूरपणा...






उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथील उद्योजक डॉ.अरविंद कुमार गोयल यांनी आपली संपूर्ण संपत्ती गरिबांसाठी दान केली आहे. या मालमत्तेची एकूण किंमत सुमारे 600 कोटी रुपये आहे. गोयल यांनी स्वत:कडे फक्त मुरादाबाद सिव्हिल लाईन्स इथलं एक घर ठेवलं आहे. 50 वर्षांच्या मेहनतीने त्यांनी हे साम्राज्य उभं केलं होतं.

गोयल यांनी थेट राज्य सरकारला देणगी दिली आहे. जेणेकरुन गरजूंपर्यंत मदत पोहोचू शकेल. उत्तर प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्रासह अनेक राज्यांमधील 100 हून अधिक शैक्षणिक संस्था, वृद्धाश्रम आणि रुग्णालयांमध्ये ते विश्वस्त आहेत. कोविडमुळे लागू झालेल्या लॉकडाऊनच्या काळातही त्यांनी मुरादाबादची 50 गावं दत्तक घेऊन नागरिकांना मोफत अन्न आणि औषधं दिली होती.

**कुटुंबाचाही निर्णयाला पाठिंबा**

डॉ. गोयल यांच्या कुटुंबात पत्नी रेणू, दोन मुलं आणि एक मुलगी यांचा समावेश आहे. त्यांचा मोठा मुलगा मधुर गोयल मुंबईत राहतो. लहान मुलगा शुभम प्रकाश गोयल हा मुरादाबाद इथे राहतो आणि वडिलांना व्यवसायात मदत करतो. मुलगी लग्नानंतर बरेली येथे राहते. त्यांच्या या निर्णयाचे त्यांच्या मुलांनी आणि पत्नीने स्वागत केलं आहे.

डॉ. अरविंद कुमार गोयल यांनी सोमवारी (18 जुलै) रात्री संपत्ती दान करण्याची घोषणा केली. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी सांगितलं की, "मी 25 वर्षांपूर्वीच माझी संपत्ती दान करण्याचा निर्णय घेतला होता." त्यावेळी घडलेल्या एका घटनेचा संदर्भ देत ते म्हणाले की, "डिसेंबरचा महिना होता. मी ट्रेनमध्ये चढताच एक गरीब माणूस थंडीने थरथर कापताना दिसला. त्याच्या पायात ना चप्पल होती, ना अंगावर चादर. त्याला पाहून माझं मन हेलावलं. मी स्वत:ला थांबवू शकलो नाही. मी माझे शूज काढले आणि त्याला दिले. मी काही वेळ सहन केले. पण कडाक्याच्या थंडीमुळे माझीही प्रकृती खराब होऊ लागली."


"त्या दिवशी मला वाटले की असे किती लोक थंडीने गारठत असतील. तेव्हापासून मी गरीब आणि निराधारांना मदत करण्यास सुरुवात केली. आता मी खूप प्रगती केली आहे. आयुष्यात काय घडेल सांगता येत नाही. त्यामुळे जीवंत असेपर्यंत संपत्ती योग्य हातात सुपूर्द केली. जेणेकरुन ही संपत्ती अनाथ, गरीब आणि निराधार लोकांसाठी वापरता येईल. मी जिल्हा प्रशासनाला माझी संपत्ती दान करण्यासाठी पत्र लिहिले आहे.

# धडे वगळण्याचा धडा!

**व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रजांनी हिंदूस्थानावर वर्चस्व मिळवत इथली राजकीय सत्ता ताब्यात घेतली तेव्हा त्यांचा पहिला हल्ला हा शिक्षणावरच होता. त्यासाठी त्यांनी मॅकॉलेप्रणीत शिक्षणव्यवस्था लादली. त्यांनी हा प्रयोग भारतातच नाही तर इतरत्रही केला.**

उदाहरणार्थ दक्षिण आफ्रिका. त्यांनी कृष्णवर्णीयासाठी निर्माण केलेल्या शिक्षणव्यवस्थेला 'बंटू एज्युकेशन' संबोधलं जातं. या बंटू शाळांमध्ये काळ्या विद्यार्थ्यांना जमिनीची नांगरणी, पेरणी, लाकूड कसं तोडायचं हे शिकवलं जायचं. त्यांच्या शिक्षणात विज्ञान, इतिहास, नागरिकशास्त्र या विषयांचा समावेश नव्हता.

मात्र आपले पूर्वज इंग्रजांपेक्षा हुशार होते. त्यांनी इथल्या ८० टक्के समाजाच्या कानावर शिक्षण हा शब्दच पडणार नाही अशी संस्कृती निर्माण केली. महात्मा जोतीराव फुले यांनी सर्वप्रथम या समाजाच्या रोगाचं अचूक निदान 'अविद्या' हे केलं. यावरील जालीम औषध शिक्षण हेच आहे, हे सांगत ते कृतीद्वारे अमलातही आणलं. आता कुठं हा मुका समाज बोलू लागला आहे तर पुन्हा त्याला पूर्वावस्थेत नेण्याचा कृतिप्रवण कार्यक्रम सुरू झाला आहे. राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी)



१८२ पुस्तकांमध्ये केल्या गेलेल्या १,३३४ बदलांनी ही गोष्ट अधोरेखित झाली आहे. परिच्छेदच्या परिच्छेद वगळून, मोडतोड करून आणि प्रक्षिप्त मजकूर घुसडवून, विकृतीकरण करत अभ्यासक्रमाचं प्रचार साहित्यात रूपांतर केलं जात आहे.

एनसीईआरटीच्या सहावी ते १२ वीपर्यंतच्या विशेषत: इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या विषयांच्या अभ्यासक्रमात २०१७ ते २०२२ या पाच वर्षांच्या काळात तीन वेळा हे बदल करण्यात आले. थोडक्यात आढावा घेतला तर असं दिसतं की आणीबाणीचा काळ, गुजरात दंगल यामधील मजकुरात बदल करण्यात आले. गुजरात दंगलीवरील दोन पाने, त्या संदर्भातील मानवी हक्क आयोगाचा अहवाल, तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची टिपण्णी हे सगळं काढून टाकण्यात आलं आहे.

'राइज ऑफ पॉप्युलर मूव्हमेन्ट' या धडय़ातील चिपको आंदोलन, शेतकरी आंदोलन, आंध्र प्रदेशातील दारूबंदी आंदोलन, महाराष्ट्रातील दलित पँथर चळवळ, नर्मदा आंदोलन, सातपुडय़ातील आदिवासांनी अधिकारांसाठी केलेलं आंदोलन यांची माहिती काढून टाकण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना समाजाच्या सांस्कृतिक जाणिवेशी जोडण्याऐवजी तिच्यापासून अनभिज्ञ ठेवण्यासाठी शिक्षणाचा साधन म्हणून वापर केला जात आहे. या 'स्कूल'चा पायाच मुळी जॉर्ज ऑरवेल म्हणतो त्याप्रमाणे, 'अज्ञान हीच शक्ती' या सिद्धांतावर बेतलेला आहे. यातून 'की एलिमेन्ट्स ऑफ डेमोक्रेटिक गव्हर्मेन्ट' हा धडा वगळण्यात आला आहे. त्यात लोकशाहीचा विस्तृत परिचय करून

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।  
मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥  
ऐसा संताचा महिमा ।  
जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पोलीस भरतीसाठी आलेल्या उमेदवारांची रात्र रस्त्यावर!

## सुरक्षेच्या कारणास्तव कलिना संकुलात घेण्यास मुंबई विद्यापीठाचा नकार




### विद्यार्थ्यांसाठी सुविधा

**मुंबईत पोलीस भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या वास्तव्याची व्यवस्था कलिना येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर करण्यात आली आहे. उमेदवारांच्या सोयीसाठी कलिना येथील मुंबई विद्यापीठाच्या संकुलापासून पोलीस मुख्यालयाच्या मैदानापर्यंत मार्ग दर्शविणारे फलकही लावण्यात आले आहेत. परंतु भरतीदरम्यान प्रथम प्रवेश मिळावा आणि गर्दी टाळण्यासाठी अनेक उमेदवार रात्रीच मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलाच्या प्रवेशद्वारासमोर येऊन थांबतात, असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले.**

। मुंबई । महाईन्यूज ।

**पोलीस भरतीसाठी राज्यभरातून हजारो उमेदवार मुंबईत दाखल झाले आहेत. सांताक्रूझ येथील मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील मैदानावर पोलीस भरतीसाठी गुरुवारी मैदानी चाचणी घेण्यात येत आहे. मात्र, भरतीसाठी आलेल्या उमेदवारांना सुरक्षेचे कारण पुढे करीत मुंबई विद्यापीठ प्रशासनाने संकुलाच्या आवारात वास्तव्यास मनाई केली. परिणामी, या उमेदवारांना बुधवारची रात्र रस्त्यावरच काढवी लागली. विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर, पदपथावर, तसेच पुलाखाली शेकडो उमेदवार रात्री मुक्कामी होते.**

सत्ताधाऱ्यांनी वांद्रे-कुर्ला संकुलात आयोजित केलेल्या राजकीय सभांच्या वेळी मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलात वाहनतळाची व्यवस्था करण्यात आली होती; परंतु पोलीस भरतीसाठी आलेल्या उमेदवारांना आसरा दिला जात नाही. या परिसरात मोठ्या प्रमाणात गाड्यांची वर्दळ असते. यामुळे रात्री अपघात झाल्यास त्यास जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित करीत सर्वच स्तरांतून मुंबई विद्यापीठ प्रशासन व महाराष्ट्र शासनाच्या विरोधात रोष व्यक्त करण्यात येत आहे. '४-५ दिवसांपूर्वीच पोलीस भरतीसाठी आम्ही मुंबईत आलो आहोत; परंतु मुंबई विद्यापीठाने अद्यापही आमची कलिना संकुलातील मैदानात राहण्याची व्यवस्था केलेली नाही. उमेदवार रात्री पदपथावरच झोपत आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# किरीट सोमय्यांच्या कार्यालयात घोटाळा

। मुंबई । महाईन्यूज ।



घोटाळेबाजांच्या मागे लागून त्यांना नामोहरम करणारे भाजप नेते किरीट सोमय्यांच्या कार्यालयात घोटाळा झाला आहे. याप्रकरणी पोलिस ठाण्यामध्ये दोघांविरोधात तक्रार देण्यात आली आहे.

मुंबईतल्या मुलूंडमध्ये किरीट सोमय्या यांचं कार्यालय आहे. 'ऐका स्वाभिमानाने' या उपक्रमांतर्गत श्रवणयंत्र वाटप करण्यात येत होते. मात्र यातच दोघांनी गैरव्यवहार केल्याची माहिती आहे. जवळपास साडेसात लाख रुपयांच्या श्रवणयंत्रांचा परस्पर अपहार झाला असून कार्यालय प्रमुखांच्या ही बाब लक्षात आली. त्यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेतली. नवघर पोलिस ठाण्यामध्ये दोघांविरोधात गुन्हा नोंद झाला आहे.कार्यालयप्रमुख प्रफुल्ल कदम यांच्या तक्रारीवरुन नवघर पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला. युवक प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट ही किरीट सोमय्या यांची संस्था आहे. संस्थेमार्फत ५०० रुपयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना श्रवणयंत्र दिले जाते. याच कार्यालयातील प्रज्ञा जयंत गायकवाड आणि श्रीकांत रमेश गावित यांनी ७ लाख ३६ हजार रुपयांचा अपहार केल्याची प्राथमिक माहिती आहे.

### श्रवणयंत्रांचा परस्पर अपहार

**मुंबईतल्या मुलूंडमध्ये किरीट सोमय्या यांचं कार्यालय आहे. 'ऐका स्वाभिमानाने' या उपक्रमांतर्गत श्रवणयंत्र वाटप करण्यात येत होते. मात्र यातच दोघांनी गैरव्यवहार केल्याची माहिती आहे. जवळपास साडेसात लाख रुपयांच्या श्रवणयंत्रांचा परस्पर अपहार झाला असून कार्यालय प्रमुखांच्या ही बाब लक्षात आली. त्यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेतली. नवघर पोलिस ठाण्यामध्ये दोघांविरोधात गुन्हा नोंद झाला आहे.करत विरोधकांनी आक्रमक भूमिका मांडली.**

# "मविआने एकजूट दाखवली तर 2024ला राज्यात सत्ता येईल"

## खासदार संजय राऊत यांनी एकत्र राहिलो तर राज्यात सत्ता मिळवू असा विश्वास केला व्यक्त

। सांगली । महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आलेल्या कसबा आणि चिंचवड निवडणुकीचे वारे आता थंडावले आहे. कसबा पेठेत महाविकास आघाडीने भाजपचा पराभव करत दणदणीत विजय मिळवला आहे. तर चिंचवडमध्ये राहुल कलाटे यांनी बंडखोरी करत अपक्ष फॉर्म भरल्यामुळे नाना काटे यांनी कलाटे यांची मते घेतली आणि चिंचवडमध्ये महाविकास आघाडीचा पराभव झाला.**

### लोकसभेला 40 जागा निवडून येतील

**कसब्याचा निकाल हा महाराष्ट्राच्या राजकीय भविष्यासाठी मार्गदर्शक असल्याचंही ते म्हणाले आहेत. तर 2024 पर्यंत महाविकास आघाडीने मजबुतीने एकत्रितपणे काम केलं तर विधानसभेत 200 पेक्षा जास्त जागा निवडून येतील. तसेच लोकसभेला 40 जागा निवडून येतील असा विश्वास संजय राऊतांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे.**



यावर बोलताना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एकत्र राहिलो तर राज्यात सत्ता मिळवू असा विश्वास व्यक्त केला आहे.

माध्यमांशी बोलताना खासदार संजय राऊत म्हणाले की, महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्र लढलो तर कसब्याचा निकाल लागतो आणि थोड जर इकडं तिकडं झालं तर चिंचवडप्रमाणे निकाल लागतो. हा दोन्ही ठिकाणच्या मतदारांनी दिलेला धडा असल्याचे वक्तव्य शिवसेना खासदार (ठाकरे गट) संजय राऊत यांनी केलं आहे.

कसब्याचा निकाल हा महाराष्ट्राच्या राजकीय भविष्यासाठी मार्गदर्शक असल्याचंही ते म्हणाले आहेत. तर 2024 पर्यंत महाविकास आघाडीने मजबुतीने एकत्रितपणे काम केलं तर विधानसभेत 200 पेक्षा जास्त जागा निवडून येतील. तसेच लोकसभेला 40 जागा निवडून येतील असा विश्वास संजय राऊतांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे.

तर चिंचवडमधील पराभवावर बोलताना राऊत म्हणाले की, "चिंचवडमध्ये आमच्याकडून काही बाबतीत चूक झाली. चिंचवडचा विजय हा भाजपचा विजय आहे, हे कोणीच मानणार नाही. चिंचवडमध्ये अनेक वर्षांपासून जगताप पॅटर्न चालतो आहे. हा विजयही जगताप पॅटर्नचा आहे. जर उमेदवार निवडताना अधिकची काळजी आम्ही घेतली असती किंवा राहुल कलाटेंनी माघार घेतली असती तर महाविकास आघाडीचा विजय निश्चित होता असंही राऊत पुढे म्हणाले आहेत.

तर मनसे नेते संदीप देशपांडे यांच्यावर काल झालेल्या हल्ल्याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला असता संजय राऊत यांनी मला त्याविषयी माहीत नसल्याचं यावेळी सांगितलं तर सर्व पक्षातील नेत्यांनी घोटाळा केला म्हणत मागे लागणारे भाजपचे नेते किरीट सोमय्यांच्या कार्यालयातच घोटाळा झाल्याचे उघड झाले असून यासंबधी दून जणांना ताब्यात घेण्यात आलं आहे यावरतीही संजय राऊत यांनी काय बोलणार म्हणत हसून प्रतिक्रिया दिली.

# ठाकरे गटाचा निवडणूक आयोगावर पुन्हा हल्लाबोल!

## निवडणूक आयोग राजकीय मालकांसाठी कॉंट्रॅक्ट किलर

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे निवडणूक आयोगाविषयी आणि सत्ताधाऱ्यांविषयी करत असलेल्या टीकेचा मुद्दा चर्चेत आला आहे. संजय राऊतांनी केलेल्या टीकेमुळे तर विधानसभेत थेट त्यांच्यावर हक्कभंगाचा प्रस्तावच आणण्यात आला असून त्यावर समितीही स्थापन झाली आहे. या पार्श्वभूमीवर राऊतांनी शिवगर्जना यात्रेदरम्यान निवडणूक आयोगावर खालच्या पातळीची टीका केल्याचा आरोप होत असताना ठाकरे गटानं सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या संदर्भात सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केलं आहे. तसेच, निवडणूक आयोगावर पुन्हा एकदा हल्लाबोल केला आहे.**




एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीबाबत महत्त्वपूर्ण आदेश दिले. यानुसार निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीसंदर्भात संसदेत कायदा करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, तोपर्यंत राष्ट्रपतींच्या मार्फत पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांच्या समितीकडून केंद्रीय निवडणूक आयुक्तांची नेमणूक केली जाईल, असंही सर्वोच्च न्यायालयाने नमूद केलं आहे. या निर्णयावरून मोठी चर्चा चालू असताना आता त्यावरून ठाकरे गटानं सामना अग्रलेखातून टीकास्त्र सोडलं आहे.

“महाराष्ट्रात कसबा-चिंचवडची पोटनिवडणूक झाली. त्यात काय चित्र दिसले? मुख्यमंत्री, गृहखाते सांभाळणारे उपमुख्यमंत्री, त्यांचे मंत्रिमंडळ मतदारसंघात डेरा टाकून बसले व संपूर्ण सरकारी यंत्रणा वापरण्यात आली. कसब्यात पोलीस यंत्रणेचा वापर करून साग्रसंगीत पैसे वाटप झाले. त्याची दखल निवडणूक आयोगाने घेतली नाही. कारण सगळेच सरकारी मिंधे झाले आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय राष्ट्रीय हिताचा व लोकशाहीला बळ देणारा आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निवडणूक पद्धतीप्रमाणे राज्यातील निवडणूक आयुक्तांच्या निवड प्रक्रियेला तीच दिशा द्यावी लागेल”, अशी अपेक्षाही ठाकरे गटाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

### “सत्ताधाऱ्यांच्या पायाशी सरपटणाऱ्या प्राण्यांसारखी...”

**सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल म्हणजे लोकशाहीवर उपकार असल्याचं यात म्हटलं आहे. “न्या. जोसेफ व त्यांच्या बरोबरच्या इतर न्यायवृंदाने देशाच्या लोकशाहीवर उपकार केले आहेत व भावी पिढ्यांना त्याचे स्मरण कायम राहील. सध्याच्या निवडणूक आयोगाबाबत काही बोलू नये अशीच परिस्थिती आहे. कणा नसलेल्या व सत्ताधाऱ्यांच्या पायाशी सरपटणाऱ्या प्राण्यांसारखी त्यांची अवस्था आहे. निवडणूक आयोगाची निर्णय प्रक्रिया भ्रष्ट झाली आहे व निर्णय भ्रष्ट व्हावेत यासाठी वादग्रस्त व्यक्तींची नियुक्ती सरकार करते”, असं अग्रलेखात म्हटलं आहे.**

### “...ही लोकशाहीची हत्या आहे”

**“विधिमंडळ पक्षातील चाळीस आमदारांनी पक्ष सोडला म्हणून संपूर्ण शिवसेना धनुष्यबाण चिन्हासह फुटिरांच्या खिशात घालणे हा अन्याय आहे. लोकशाहीची हत्या आहे, पण निवडणूक आयोगाने राजकीय मालकांसाठी ‘कॉंट्रॅक्ट किलर’ पद्धतीने काम करून आपली संस्थाही ‘मिंधी’च असल्याचे दाखवून दिले, पण सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने सर्व काही स्पष्ट झाले. लोकशाहीचा मुखवटा लावून बेबंदशाहीचा नंगा नाच करणाऱ्यांचे मुखवटे ओरबाडून निघाले”, अशा शब्दांत निवडणूक आयोगावर अग्रलेखात ताशेरे ओढण्यात आले आहेत.**

---

## भाजप आमदाराच्या पोराकडे सापडले ८ कोटी अन् अटक सिसोदियांना!

### केजरीवालांचा भाजपला टोला



। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शनिवारी (4 मार्च 2023) कर्नाटकमध्ये जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला. केजरीवाल म्हणाले की, भाजप नेत्याच्या मुलाला ८ कोटी रुपयांसह पकडण्यात आले. परंतु मनीष सिसोदिया यांना अटक केली.

आम आदमी पक्षाची संघटना झपाट्याने वाढत आहे, असेही ते म्हणाले.केजरीवाल म्हणाले की, अमित शहा विमानाने परत जाताच दुसऱ्या दिवशी त्यांच्या पक्षाच्या नेत्याचा एक मुलगा ८ कोटी रुपयांसह पकडला गेला, परंतु त्याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही. केजरीवाल म्हणाले की, पुढील वर्षी भाजप त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊ शकते. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी उपहासात्मक स्वरात म्हटले की, रंगेहात भाजप नेत्यांच्या मुलाला पकडले पण मनीष सिसोदिया यांना अटक करण्यात आली. हा मोठा अन्याय आहे.

केजरीवाल म्हणाले की, मनीष सिसोदिया यांच्या घरावर टाकलेल्या छाप्यात काहीही सापडले नाही. मनीष सिसोदिया यांनी कोट्यवधी रुपयांचा घोटाळ्याचा आरोप भाजपचे लोक करतात. तसे असते तर त्यांच्या घरात थोडे तरी पैसे सापडले असते.

---

## बांगलादेश: ऑक्सिजन प्रकल्पात भीषण स्फोट

### भयानक स्फोटात 6 जणांचा होरपळून मृत्यू, 30 जखमी

। नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बांगलादेशातील चित्तगॉंगच्या सीताकुंडा उपजिला परिसरातील एका ऑक्सिजन प्रकल्पामध्ये भीषण स्फोट झाला आहे. या भयानक स्फोटात सहा जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर ३० हून अधिकजण जखमी झाले आहेत. या ऑक्सिजन प्रकल्पात झालेला स्फोट इतका भयंकर होता की, घटनास्थळापासून दोन चौरस किलोमीटर परिसरातील अनेक इमारती हादरल्या आहेत, अशी माहिती स्थानिकांनी दिली आहे.**



शनिवारी दुपारी बांगलादेशच्या आग्नेय भागात ही दुर्घटना घडली. चित्तगॉंगच्या आग्नेय दिशेला ४० किमी अंतरावरील सीताकुंडा येथील ऑक्सिजन प्रकल्पात हा स्फोट घडला आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या आहेत. अग्निशमन दलाच्या जवानांकडून बचाव कार्य सुरू आहे.

मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हा स्फोट नेमका कशामुळे झाला, याचं नेमकं कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलं नाही, अशी माहिती अग्निशमन दलाच्या जवानांनी दिली.स्थानिक सरकारी अधिकारी शहादत हुसेन यांनी ‘रॉयटर्स’ला सांगितलं की, “घटनास्थळावरून आतापर्यंत सहा मृतदेह बाहेर काढले आहेत.बचाव दलाचं काम अद्याप सुरूच आहे. ऑक्सिजन प्रकल्पाच्या आजुबाजुच्या इमारतीही हादरल्याने लोकांमध्ये भीतीचं वातावरण आहे.

---

## अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्र्यांनी घेतला रिक्षा प्रवासाचा आनंद

। नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

G20 परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीसाठी भारतात आलेले अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री अँटनी ब्लिंकन यांनी शुक्रवारी परत जाण्यापूर्वी अमेरिकेच्या दूतावासातील कर्मचाऱ्यांची भेट घेतली. परत जाण्यापूर्वी ब्लिंकन यांनी रिक्षाची सफर केली, तसंच मसाला चहाही



पिला. देशातील विविध शहरांमध्ये राहणारे अमेरिकन नागरिक आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा समूह नवी दिल्लीत ब्लिंकन यांना भेटला. या भेटीनंतर, ब्लिंकन यांनी ट्वीट केलं. ते म्हणालं, "भारत-अमेरिका संबंध मजबूत करण्यासाठी त्यांच्या कठोर परिश्रमाबद्दल आणि वचनबद्धतेबद्दल मी मनापासून कृतज्ञ आहे". अँटनी ब्लिंकन यांनी मुंबई, कोलकाता, हैदराबाद आणि चेन्नई येथील अमेरिकन दूतावासातील कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

ब्लिंकन यांनी एक फोटोही शेअर केला आहे. ते एका ऑटो-रिक्षातून उतरताना दिसत आहेत. त्यांच्या सोबत काही कर्मचारीही होते. दिल्लीतील अमेरिकी दूतावासाने ब्लिंकनच्या ऑटो-रिक्षा सफरीचा व्हिडिओ पोस्ट केला आहे.ब्लिंकन यांनी आज नवी दिल्लीत महिला नागरी समाजाच्या नेत्यांचीही भेट घेतली. यावेळी त्यांनी मसाला चहाचा आस्वादही घेतला.बैठकीदरम्यान, त्यांनी महिला सक्षमीकरणावरील त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्यावर चर्चा केली.

## तरुण पिढीबद्दल कंगना रणौतंच परखड मत

कंगना रणौत सोशल मीडियावर काही ना काही पोस्ट करत असते. ती कधी वादग्रस्त विधाने तर कधी पोस्टच्या माध्यमातून कोणाचे तरी कौतुक करत असते. बऱ्याचदा कंगना देशातील महत्त्वाच्या समस्यांबद्दल भाष्य करते, याबरोबरच ती तिच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वतःची मतं बिनधास्त आणि परखडपणे मांडत असते. नुकतंच कंगनाने तिच्या एका पोस्टमध्ये सध्याच्या तरुण पिढीविषयी मत व्यक्त केलं आहे.

१९९७ ते २०१२ मध्ये जन्मेलेल्या पिढीतील मुलांना सध्या 'जेन झी' असं संबोधलं जातं. याच पिढीतील मुलांच्या जीवनशैलीबद्दल आणि एकूणच त्यांच्या आयुष्याकडे बघायच्या दृष्टीकोनाबद्दल कंगनाने तिचं परखड मत मांडलं आहे. तिच्या मते या पिढीतील मुलं ही प्रत्येक बाबतीत आळशी आहेत शिवाय तंत्रज्ञानाशी या मुलांचा थेट संबंध आल्याने त्याचा त्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावरही परिणाम झाल्याचं कंगनाने स्पष्ट केलं.कंगना आपल्या पोस्टमध्ये म्हणते, "जेन झी...या लोकांचे हातपाय काड्यांप्रमाणे कमकुवत झाले आहेत. लोकांशी संभाषण, निरीक्षण तसेच वाचन यापेक्षा ही मुलं त्यांचा सर्वाधिक वेळ त्यांच्या स्मार्टफोनवर घालवतात. या मुलांना समोरच्या व्यक्तीला सन्मान देणं कधीच जमत नाही, या मुलांना फक्त लवकरात लवकर यशस्वी व्हायचं आहे त्यासाठी त्यांना स्वतःला शिस्त लावायची नाहीये, त्यांना सगळं पटकन हवं आहे." पुढे कंगना म्हणाली, "जेन झी मुलांना स्टारबक्स आणि अवोकाडो टोस्ट प्रचंड आवडतं पण आजच्या जमान्यात त्यांना स्वतःचं घर घेणं शक्य नाही. त्यांना ऊंची ब्रँडेड कपडे परिधान करायला आवडतात, पण नाती टिकवण्यासाठी एखाद्याशी प्रामाणिक राहणं त्यांना जमत नाही. काही रीपोर्टनुसार तर सेक्समध्ये सुद्धा ही मुलं प्रचंड आळशी आहेत.



## महिला दिनानिमित्त चित्रपटगृहात पुन्हा झळकणार 'झिम्मा'




हेमंत ढोमे दिग्दर्शित 'झिम्मा' या सुपरहिट चित्रपटाने मागील वर्षी प्रेक्षकांना विशेषतः महिलांना वेडं लावले होते. हा आनंद पुन्हा एकदा महिलांना अनुभवता येणार आहे. निमित्त आहे ८ मार्चचे म्हणजेच जागतिक महिला दिनाचे. याच खास दिनाचे औचित्य साधत बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालणारा 'झिम्मा' पुन्हा एकदा चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये प्रदर्शित होणारा हा चित्रपट आठवड्यावर चित्रपटगृहांत झळकणार आहे. या चित्रपटात निर्मिती सावंत, सुहास जोशी, क्षिती जोग, सुचित्रा बांदेकर, सोनाली कुलकर्णी, सायली संजीव, मृण्मयी गोडबोले आणि सिद्धार्थ चांदेकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

महिला दिनानिमित्त पुन्हा एकदा प्रदर्शित होणाऱ्या 'झिम्मा' चित्रपटाबद्दल निर्माती क्षिती जोग म्हणतात, "माझं या चित्रपटाशी एक भावनिकदृष्ट्या नातं जोडलं गेलं आहे. हा चित्रपट मी पुन्हा एकदा महिलादिनी माझ्या मैत्रिणीसोबत बघून साजरा करणार आहे. हा चित्रपट पुन्हा एकदा त्याच जोमात प्रदर्शित होणार आहे, याचा मला आनंद आहे. महिलांना हा चित्रपट आपल्या जीवनाशी भावनिकदृष्ट्या जवळीक साधणारा वाटला. अनेकींनी हा चित्रपट पाहून संसारातून वेळ काढत आपल्या मैत्रिणींसोबत सहलींचा बेतही बनवला. ज्या स्त्रिया कधीच चित्रपटगृहात गेल्या नव्हत्या, त्या खास 'झिम्मा' बघायला गेल्या. अनेकींनी यांचे हे अनुभव प्रत्यक्ष, सोशल मीडियाद्वारे, मेसेज करून आमच्यापर्यंत पोहोचवले. आयुष्य भरभरून जगायला शिकवणारा हा चित्रपट आहे." 'चलचित्र कंपनी' आणि 'क्रेझी फ्यू फिल्म्स' निर्मित 'झिम्मा' चित्रपटाचे लेखन इरावती कर्णिक यांनी आहे.

## पुरस्कार हुकला तरी बायकोनं दिलं भन्नाट सरप्राईज



अभिनेता सुयश टिळक सोशल मिडियावर कायम ॲक्टिव्ह असतो. सुयश आणि त्याची बायको आयुषी भावे सोशल मीडियावर कायम एकमेकांसोबतचे रोमँटिक फोटो पोस्ट करत असतात. बायकोने नवऱ्यासाठी काय करावं याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सुयशच्या बायकोने केलेली कृती. आयुषीने सुयशसाठी एक कृती करून त्याचं मन जिकलचं शिवाय त्याचा मुडही चांगला केलाय.सुयशला एका पुरस्कार सोहळ्यासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून नामांकन मिळालं होतं. पण सुयशला विजेतेपदावर मात्र नाव कोरता आले नाही. त्यामुळे सुयश नककीच निराश झाला असणार. सुयश घरी आला तेव्हा त्याचा गेलेला मुड आनंदी करण्यासाठी सुयशची बायको आयुशीने त्याच्यासाठी खास सरप्राईज प्लॅन केलं होतं. सुयशचं मनोबल वाढवण्यासाठी आयुशीने घरात ठिकठिकाणी चिठ्ठ्या लावून त्यावर खास संदेश लिहिला होता. सुयशने घरातला हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेयर करून बायकोसाठी खास भावना व्यक्त केल्यात. सुयश लिहितो.. हे खूप स्पेशल आहे. मी काल रात्री कोणताही पुरस्कार जिंकला नाही पण माझ्या पत्नीने सुंदर सरप्राईज नोट्स बनवल्या आणि खूप प्रेमाने माझे घरी स्वागत केले. धन्यवाद आयुषी हे फार सुंदर जग आहे.

## ऋतिक रोशन-सबा आजाद अडकणार विवाहबंधनात?

बॉलिवूडमध्ये सध्या लग्नाचा ट्रेंड सुरु आहे. नुकत्याच काही दिवसांपूर्वी कियारा अडवाणी, सिद्धार्थ मल्होत्रा बॉलिवूड अभिनेता ऋतिक रोशन आणि त्याची गर्लफ्रेंड सबा आजाद मागील अनेक दिवसांपासून त्यांच्या नात्यामुळे चर्चेत आहेत. अशातच आतादोघंही लग्न करणार असल्याची चर्चा सर्वत्र रंगली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दोघंही नोव्हेंबर 2023 मध्ये विवाह बंधनात अडकणार आहेत. दरम्यान, याबाबत दोघांनी कोणताही खुलासा केला नाही.मिळालेल्या माहितीनुसार, सबाने ऋतिकच्या संपूर्ण कुटुंबाचा आणि मुलांचा देखील स्वीकार केला आहे. ऋतिकची आधीची पत्नी सुजैनसोबत देखील सबाचे चांगले संबंध आहेत. त्यांना अनेकदा पार्टीमध्ये एकत्र स्पॉट झाले आहेत.

ऋतिक रोशनचे आगामी चित्रपट

ऋतिक रोशन येत्या काळात दीपिका पदुकोणसोबत सिद्धार्थ आनंदच्या 'फाइटर'मध्ये दिसणार आहे. या चित्रपटात अनिल कपूर आणि करण सिंग ग्रोव्हर यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.

## नाटकात रमणारी 'निर्मिती'



प्रत्येक सामान्य माणसाची चिडचिड झाली की एक वाक्य त्याच्या तोंडातून येतेच ते म्हणजे हा 'माझ्याच राशीला का आला आहे ?', याच वाक्यावर आधारित अर्थात राशींवर आधारित 'आलंय माझ्या राशीला' हा चित्रपट अलीकडेच प्रदर्शित झाला होता. ज्योतिर्विद वास्तुतज्ज्ञ आनंद पिंपळकर यांची पहिली निर्मिती असलेला 'आलंय माझ्या राशीला' या चित्रपटात बारा कलाकारांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या होत्या, ज्यात अभिनेत्री निर्मिती सावंत यांचीही प्रमुख भूमिका होती. 'झिम्मा' चित्रपटातील त्यांची भूमिकाही गाजली आणि आता तर 'झिम्मा २'चे बिगूलही वाजले आहे. मात्र चित्रपटांपेक्षा आपण नाटकात जास्त रमतो, असं निर्मिती सावंत सांगतात. करोनाकाळात मनोरंजनसृष्टी पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यानंतर पुन्हा मनोरंजन क्षेत्राचे काम त्याच धडाडीने सुरू झाले ही सुखदायी बाब होती. त्यामुळे अनेक कलाकारांनी एकाचवेळी नाटक, चित्रपट आणि मालिकांमध्ये काम करायला सुरुवात केली.

# हरमनप्रीतचे तुफानी अर्धशतक!

## मुंबईच्या भेदक गोलंदाजीसमोर गुजरातचा 143 धावांनी दारूण पराभव

।इंदूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**शनिवारी (दि. ४ मार्च) नवी मुंबईच्या डॉ. डी. वाय. पाटील स्टेडिअममध्ये महिला प्रीमिअर लीग २०२३ स्पर्धेला सुरुवात झाली. महिला प्रीमियर लीगच्या पहिल्या सामन्यात मुंबई संघाचा सामना गुजरात जायंट्सशी झाला. या सामन्यात हरमनप्रीत कौरच्या संघाने तब्बल १४३ धावांनी दणदणीत विजय मिळवला. हरमनप्रीतची शानदार तुफानी अर्धशतकी खेळी आणि त्याला गोलंदाजांची मिळालेली साथ यामुळे गुजरातचा अक्षरशः धुव्वा उडवला. हरमनला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.**



आजच्या सामन्यात नाणेफेक जिंकत गुजरात गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. यावेळी मुंबईने प्रथम फलंदाजी करत ऐतिहासिक धावसंख्या उभारली. कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या अर्धशतकाच्या जोरावर मुंबईने २०७ धावा चोपत गुजरातसमोर २०८ धावांचे भले मोठे आव्हान ठेवले होते. मात्र धावांचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात अतिशय खराब झाली. अवघ्या पाच धावांत त्यांनी ३ विकेट्स गमावल्या त्यात हरलीन आणि गार्डनर यांना भोपळाही फोडता आला नाही.

कर्णधार बेथ मूनी तिसऱ्याच चेंडूवर दुखापतग्रस्त होऊन मैदानाबाहेर पडली. दयालन हेमलता सोडल्यास कोणालाही दोन आकडी धावसंख्या गाठता आली नाही. तिने २३ चेंडूत २९ धावा केल्या. ठराविक अंतरावर विकेट्स गमावल्याने अवघ्या ६४ धावांत गाशा गुंडाळला गेला. मुंबईकडून सायका इशाकने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. तिने कसून गोलंदाजी करत गुजरातच्या नाकेनऊ आणले. नेट सायव्हर-ब्रंट आणि अमेलिया केरने प्रत्येकी २ विकेट्स घेत तिला साथ दिली. तर वेगवान गोलंदाज इस्सी वोंगला देखील १ विकेट घेण्यात यश मिळाले. टिच्चून गोलंदाजी करणाऱ्या मुंबईकरांपुढे गुजरातचा निभाव लागू शकला नाही.

यष्टीरक्षक यास्तिका भाटिया अवघ्या एका धावेवर बाद झाल्यानंतर हिली मॅथ्यूज आणि नेट सायव्हर यांनी मुंबईचा डाव सावरला. मात्र अर्धशतक करण्यापूर्वीच मॅथ्यूज ४७ धावा करून बाद झाली. त्यानंतर आलेली कर्णधार हरमनप्रीत कौर आणि अमेलिया केर यांच्यात तब्बल ८९ धावांची भक्कम भागीदारी झाली आणि तिथेच गुजरातची अवस्था बिकट झाली होती. हरमनप्रीतने कर्णधारपदाला साजेशी खेळी करत महिला प्रीमिअर मधील पहिले-वहिले अर्धशतक झळकावले. तिने ३० चेंडूत ६५ धावांची तुफानी खेळी केली. तर अमेलियाने २४ चेंडूत ४५ धावांची खेळी करत तिला साथ दिली. गुजरातकडून स्नेह राणा खूप महाग ठरली पण तिलाच सर्वाधिक २ विकेट्स घेता आल्या. तर ऐश गार्डनर, तनुजा कंवर आणि जॉर्जिया वेअरहॅम यांना प्रत्येकी १-१ विकेट्स घेण्यात यश मिळाले.

गुजरातला हा सामना जिंकण्यासाठी मोठ्या भागीदारीची आवश्यकता होती. मात्र त्यात जायंट्स अपयशी पडले. दवाचा किती परिणाम होतो याची सर्वांना उत्सुकता होती या सामन्यात फारसे तसे काही पहावयास मिळाले नाही.

# जैस्वालचा डबल धमाका!

## आधी द्विशतक अन् नंतर शतक झळकावून रचला इतिहास

।इंदूर ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कधी काळी पाणीपुरी विकणारा मुलगा आता क्रिकेटचे मैदान गाजवत आहे. मुंबईच्या या युवा फलंदाजानं इतिहास रचला आहे. हा 21 वर्षीय मुंबईचा फलंदाज जेव्हा जेव्हा क्रिजवर येतो तेव्हा त्याच्या बॅटमधून धावांचा पाऊस पडतो. रणजी ट्रॉफीमध्ये अप्रतिम कामगिरी केल्यानंतर आता यशस्वी जैस्वालने इराणी चषकातही धमाका केला आहे.**



ग्वाल्हेरमध्ये मध्य प्रदेशविरुद्धच्या पहिल्या डावात द्विशतक झळकावल्यानंतर यशस्वी जैस्वालने दुसऱ्या डावातही शतक झळकावले. मोठी गोष्ट म्हणजे जैस्वालने हे शतक 100 पेक्षा जास्त स्ट्राईक रेटने केले.

इराणी चषकाच्या पहिल्या डावात द्विशतक आणि दुसऱ्या डावात शतक झळकावणारी यशस्वी जैस्वाल हा पहिली खेळाडू ठरला आहे. इराणी कपमध्ये 300 हून अधिक धावा करणारा यशस्वी दुसरा भारतीय आहे. यापूर्वी हा विक्रम शिखर धवनच्या नावावर होता. आता जयस्वालने त्याची बरोबरी केली आहे. जैस्वालने पहिल्या डावात 213 धावा केल्या होत्या आणि दुसऱ्या डावातही शतक झळकावले आहे. दुसऱ्या डावात शेष भारताने कर्णधार मयंक अग्रवाल शून्यावर गमावला. बाबा इंद्रजितलाही खाते उघडता आले नाही. पहिल्या चेंडूवर यश धुलचीही आऊट झाला. मात्र यशस्वी धावांचा पाऊस पाडला.

## महिला प्रीमियर लीग: दहावीची विद्यार्थिनी गुजरात जायंट्ससाठी गाजवणार मैदान

। पीटीआय। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

महिला क्रिकेटसाठी शनिवारचा दिवस ऐतिहासिक ठरणार आहे. महिला प्रीमियर लीग २०२३ (WPL 2023) ४ मार्चपासून सुरू होत आहे. पहिला सामना मुंबई इंडियन्स आणि गुजरात जायंट्स यांच्यात रात्री आठ वाजता सुरु होणार आहे. विशेष म्हणजे या मॅचमध्ये दहावीत शिकणारी एक मुलगी मैदान गाजवताना दिसणार आहे. गुजरात जायंट्सची खेळाडू शबनम शकील केवळ १५ वर्षांची आहे.

सोनम यादवसोबत ती सर्वात तरुण क्रिकेटर आहे. शबनमचा जन्म १७ जून २००७ रोजी झाला. आंध्र प्रदेशातील मूळ क्रिकेटपटू विशाखापट्टणम येथील शिव सिवनी स्कूल, मेरीपलेम येथील दहावीची विद्यार्थीनी आहे. ती उजव्या हाताची फलंदाज आणि मध्यमगती गोलंदाज आहे. तिला गुजरात जायंट्सने १० लाख अशा प्रकारे क्रिकेटची आवड निर्माण झाली –

शबनम शकीलच्या क्रिकेट प्रेमाची कहाणीही रंजक आहे. तिच्या वडिलांना वेगवान गोलंदाज म्हणून क्लब क्रिकेट खेळताना पाहिल्यावर तिला प्रथम क्रिकेटची आवड निर्माण झाली. त्यावेळी ती फक्त आठ वर्षांची होती. तिची क्रिकेटची आवड पाहून वडिलांनी तिला विशाखापट्टणम येथील एनएडी अकादमीमध्ये प्रवेश मिळवून दिला.

